# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.08.2025** **वार-गुरुवार**

---

**राजगड**

छत्रपती शिवाजी महाराजांची पहिली राजधानी असलेल्या पुणे जिल्ह्यातील राजगड या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या वेल्हे तालुक्याचं नाव राजगड करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. या निर्णयाला केंद्र सरकारनेही मान्यता दिली आहे. लवकरच या संदर्भात राजपत्र जारी होईल, अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल समाजमाध्यमावर दिली.

**नाट्य परिषद**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेतर्फे दिला जाणारा बालगंधर्व स्मृती पुरस्कार ज्येष्ठ नाट्य समीक्षक ज्ञानेश पेंढारकर यांना, स्मिता पाटील स्मृती पुरस्कार अभिनेत्री स्पृहा जोशी, यांना तर अरुण सरनाईक स्मृती पुरस्कार अभिनेता आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांना जाहीर झाला आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचा 29वा वर्धापनदिन येत्या 23 ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे, त्या कार्यक्रमात मान्यवरांना हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

**अंतराळ दिन**

पिंपरी चिंचवड महापालिका विविध संस्थांच्या सहकार्यानं येत्या 23 ऑगस्ट रोजी 'राष्ट्रीय अवकाश दिन' साजरा करणार आहे. यानिमित्त महापालिकेच्या सायन्स पार्क परिसरात विविध उपक्रम होणार आहेत. 'आर्यभट्ट ते गगनयान-प्राचीन ज्ञान-अनंत संधी' अशी यंदाच्या राष्ट्रीय अवकाश दिनाची संकल्पना आहे. इस्रोमधील ज्येष्ठ शास्त्रज्ञ ए. के. सिन्हा यांचं यावेळी व्याख्यान होणार आहे.

**बोनस**

पुणे महापालिकेच्या कंत्राटी कामगारांना बोनस देण्यात येईल, असं पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितलं. पुणे महापालिकेतील सुमारे साडेदहा हजार कंत्राटी कामगारांना बोनस मिळावा, पगारी रजा मिळाव्यात, अशा मागण्या प्रलंबित होत्या. त्यासंदर्भात आयुक्त नवल किशोर राम यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**मोहन गुजराथी**

यशस्वी उद्योजकांची चरित्र हा प्रेरणेचा महत्त्वाचा स्त्रोत असून, विद्यार्थ्यांनी उद्योजकांची चरित्र वाचणं गरजेचं असल्याचं मत प्रबोध उद्योग समूहाचे प्रमुख मोहन गुजराथी यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डी. एस. सावकार अध्यासन आणि स. प. महाविद्यालयातील वाणिज्य विभागानं आयोजित केलेल्या उद्योजकांशी संवाद या उपक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागात येत्या 23 आणि 24 ऑगस्ट रोजी ॲपटॉस या कंपनीतर्फे ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित हॅकेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. ही स्पर्धा केवळ देशभरातील विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. ब्लॉकचेनमध्ये क्षेत्रामध्ये आवड आणि कौशल्य असणाऱ्या कोणालाही यात सहभाग घेता येणार आहे.

**शिवसृष्टी बंद**

पुण्यातील शिवसृष्टीमध्ये देखभालीचं काम केलं जाणार असल्याने येत्या 27 आणि 28 ऑगस्ट रोजी शिवसृष्टी बंद राहणार असल्याची माहिती शिवसृष्टीचे प्रशासकीय अधिकारी अनिल पवार यांनी दिली आहे. 29 ऑगस्टपासून शिवसृष्टी पुन्हा पहिल्यासारखी सुरू असेल, असंही त्यांनी सांगितलं.

**पिंपरी चिंचवड**

महिला बचत गटांच्या निर्मितीसाठी ऑनलाईन प्रमाणपत्र उपलब्ध करून देणाऱ्या प्रणालीचं उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे यांच्या हस्ते नुकतच करण्यात आलं. महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून अर्ज करून बचत गटांनी प्रमाणपत्र मिळवता येईल.

**स्थगिती**

पुण्यातील जनता वसाहतीच्या साडेसातशे कोटींच्या वादग्रस्त टिडीआर देण्याच्या प्रक्रियेला राज्य सरकारच्या गृह निर्माण विभागा आज स्थगिती दिली आहे. या प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश गृह निर्माण विभागाने झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाला दिले आहेत.

**म्हाडा**

पुण्यातील लोकमान्यनगर या म्हाडाच्या वसाहतीत सुरू असलेल्या पुनर्विकासाच्या कामाला अचानक देण्यात आलेल्या स्थगितीमुळे संतप्त झालेल्या रहिवाश्यांनी आज म्हाडाच्या पुणे विभागाचे अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिलं. यातील अनेक इमारती राहण्यासाठी धोक्याच्या झाल्या असून पुनर्विकासाचे काम मध्येच थांबविल्यानं मोठं

आर्थिक नुकसान होत आहे. मुख्यमंत्र्यांशी बोलून यामधून तातडीनं तोडगा काढावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**<u>अतिदक्षता विभाग</u>**

यंदाच्या गणेशोत्सवात श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत अतिदक्षता विभागाची स्थापना केली जाणार आहे. राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत याचं उद्घाटन होणार आहे.

**<u>कोरियन भाषा</u>**

इंडो कोरियन सेंटरच्या वतीनं पुण्यात कोरियन भाषा परीक्षा केंद्र सुरू झालं आहे. कोरियाच्या शिक्षण मंत्रालय आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशनशी हे केंद्र संलग्न आहे. या केंद्राच्या मध्यातून कोरियन भाषा प्राविण्य परीक्षा घेतल्या जाणार असल्याची माहिती कोरियन भाषा केंद्राच्या संचालिका युन्जो लिम यांनी दिली आहे.

**<u>अपघात</u>**

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. यवत पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन वाहनं समोरासमोर आल्याने ही दुर्घटना घडली.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. उद्याही शहर परिसरात हलक्या पावसाचा अंदाज असून घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**